

दुसऱ्याविषयी प्रेम व ममता जेव्हा तुमच्या चित्तांत असेल तेव्हां तुम्ही त्यांना आत्मसाक्षात्कार देऊ शकता.

— श्री माताजी

## श्री बुध्दपूजा सारांश

## स्पेन 20 मे 1989

श्री बुध्द हे राजघराण्यात जन्मलेले, "गौतम", होते. मानव जातीचे प्रश्न अभिलाषेमधून उद्भवतात हे पहाणारे संन्यासी ते झाले. अवतार असल्यामुळे श्री बुध्दांना त्यांची खरी ज्ञानप्राप्ती वेगळ्या त-हेने झाली ज्यामुळे त्यांची शक्ति पूर्णपणे, साध्या साधकापेक्षा वेगळया त-हेने उमलू शकली.

मानवाचे बिकट प्रश्न अहंकारामधून उद्भवतात ज्यामुळे मनुष्य टोकाला पोहोचतो असं श्री बुध्दांनी शिकवलं. पिंगला नाडीवर त्यांनी काम केलं आणि अहंकारावर स्वतःला स्थित केलं. त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी येशू ख्रिस्त, महावीर आणि बुध्द हे आज्ञाचक्राचे देव, राजे आहेत. जे तपाशी संबंधीत आहे. त्यांनी आपल्यासाठी आधीच खडतर तपश्चर्या केली आहे तेव्हा आपल्याला ती करण्याची जरूर नाही.

श्री बुध्दांच्या शिकवणीचं मूलतत्व आहे पूर्ण सत्य. ज्यात स्वतःशी प्रामाणिकता धरली आहे. श्री माताजींनी समजावून सांगितली आहे की पुष्कळ लोक स्वतःशी किंवा दुस-यांशी वादविवाद करून किंवा समर्थन करणारी उत्तरं देऊन सत्यापासून दूर पळू पहातात. सहजयोगी मंडळींना समजलं पाहिजे की ते खरे ब्राम्हण आहेत कारण ब्रम्हाचं. सर्वत्र असणा-या चैतनशीततेचं सत्य त्यांना जाणवलं आहे. त्यामुळे त्यांनी अतिशय साधे आयुष्य व्यतित केले पाहीजे.

ज्यांना अहंकार आहे ते दुस-या लोकांकडून अहंकारामुळे सहज दबले जातात व त्या फॅशन्सप्रमाणे डोळे झाकून वागत जाणे हे याचं उदाहरण आहे. जर अहंकार बरोबर असेल तर आपल्याला स्वतःच शील, व्यक्तिमत्व व मनःस्थिती पाहीजे. जेव्हा माणूस अहंकाराच्या हातात खेळतो त्यावेळी डावी बाजू अधू होते. मग सूक्ष्मामध्ये थांबण्याचे काम होत नाही. आणि पावित्र्य खराब होऊ शकते. म्हणून श्री बुध्दांनी ब्रम्हचर्याचा प्रचार केला. जे जास्त उजव्या बाजूला आहेत. त्यांच्यामध्ये गुंतागुंत निर्माण होते. "त्यात काय चूक आहे" या दृष्टीकोनातून त्याची सुरवात होते. त्याच्यामधून शुष्कपणा, गतीशीलता, मुले होण्याची असमर्थता होते. अहंकार उतरवण्यासाठी आपण श्री बुध्दाची पूजा केली पाहिजे आणि हे करण्यासाठी प्रथम आपण आपल्या स्वतःच्या पावित्र्याचा आदर केला पाहिजे. लग्न आणि गृहस्थाश्रम यांच्या संबंधात हे करता येईल.

श्री माताजींनी समजावून सांगीतले आहे की, तीन प्रकारचे लोक आहेत. पहीले ते, की जे दुस-यांची पर्वा करीत नाहीत आणि स्वतःमध्येच दंग असतात. ते खूप कडक क्रूरही असू शकतात आणि त्यांना वाटते की ते सर्वात हुशार आणि चांगले आहेत. पण कोणालाही ते आवडत

नाहीत. दुस-या प्रकारचे लोक नेहमी तक्रार करीत असतात. त्यांना खूप रोग आहेत असे त्यांना वाटते आणि कुठल्याही गोष्टीबद्दल निगेटीव्ह बोलतात. पहिल्या प्रकारचा माणूस जास्त तृप्त झालेला असतो. दुसरा कधीच समाधानी होऊ शकत नाही. तिस-या प्रकारचा माणूस हा संत असतो. त्याला समाधान मिळालं आहे की नाही हे त्याला माहीत नसतं. पण दुस-याच्या समाधाना-बद्दल त्याला कळकळ (सहानुभूति) असते. श्री बुध्द हे शेवटच्या प्रकाराचे उदाहरण.

श्री बुध्दांनी तिन्ही प्रकारच्या लोकांच्या प्रश्नांना तीन मंत्रांमध्ये संबोधित केले आहे. "बुध्दं शरणं गच्छामि" जे आत्मसाक्षात्कारी आहेत त्या सर्वांना मी शरण जातो. सर्व सहजयोगी आयुष्यातील त्याच्या परिस्थिती लक्षात न आणता आदर केला पाहिजे. नंतर आहे "धर्मम् शरणं गच्छामि" माझ्या धर्माला मी वंदन करतो जो "विश्व निर्मला धर्म" आहे. यासाठी आपण विचारले पाहिजे की सहजयोगासाठी आपण काय करू शकतो? प्रत्येकाने प्रत्येक प्रकारचे काम केले पाहीजे. दुस-यावर टीका करता नये, मुख्यत्वे स्वतःची शक्ति न तपासता तिसरा मंत्र आहे "संघम् शरणं गच्छामि" मी सामूहिकतेला शरण जातो.

आतून येणारी निरासक्ति ही श्री बुध्दांच्या शिकवणूकीचा केंद्रबिंदू आहे. बाहय रूपावर केलेल्या चुकिच्या पूजेपेक्षा आत्मसाक्षात्कार हे ध्येय आहे. नंतर आलेले श्री बुध्दांचे अनुयायी हे समजू शकले नाहीत. त्याची शिकवण त्यांनी बदलली. पण सहजयोगी सहजयोग बदलू शकत नाहीत. कारण जर त्यांनी तसे केले तर त्यांची व्हायब्रेशन्स बंद होतात. पण एका गोष्टीपासून संभाळून रहा, ती म्हणजे अहंकार आपल्याला फसवू शकतो. इथपर्यंत की आपल्याला व्हायब्रेशन्स नसली तरी ती आहेत असे वाटणे.

श्री बुध्दांचा सत्याचा संदेश आपल्या उजव्या बाजूमुळे आपल्या चित्ताने कळतो. सहजयोगी म्हणून आपला स्वतःचा मीपणा कळला पाहिजे. हा विश्वधर्म आपल्याला अंतर्यामी समजला आहे व आपला त्यावर पूरेपूर विश्वास आहे हे ओळखले पाहिजे. आपले आयुष्य देवाच्या कामासाठी आहे हे जाणले पाहिजे. त्यासाठी पवित्र असले पाहिजे. दक्ष राहीले पाहिजे. आपल्या अहंकाराने स्वतःची फसवणूक करून घेता नये किंवा उपहास करता नये. करूणा, खूप मेहनत, समर्पण व त्याग या श्री बुध्दांनी शिकवलेल्या गुणांची आठवण ठेवली पाहिजे. सत्य आपल्याला सुंदर बनवणार आहे.

श्री अथेना पूजा - सारांश अथेन्स, ग्रीस

24 मे 1989

सहजयोगाच्या इतिहासात पहिल्या अथेना पूजेचं विषय म्हणजे आदर आणि पूर्णत्व देणे. (इंटेग्रेशन) उत्क्रांतीसाठी व्यक्तींनी व राष्ट्रांनी हे गुण आत्मसात केले पाहिजेत. विश्वाची नाभी म्हणून

ग्रीसने इतिहासात हे गुण दाखवले आहेत आणि या विषयांत आताही सर्व जगामध्ये पुढाकार घेणार आहे.

श्री अथेना ही आदिशक्ति आहे. जी जोडते व समग्रता प्रस्थापित करते हे करण्यासाठी श्री माताजी पृथ्वीवर वास्तव रुपांत श्री अथेना म्हणून ग्रीसमध्ये आल्या. पूर्णत्वाची शक्ति तयार करण्यासाठी जी पूर्ण चैतन्याला एक अखंड शक्ति म्हणून सगळीकडे पसरवेल.

आदिशक्तीने देवलोकाची निर्मिती {देवलोक-जिथे देवांची निर्मिती होते} ग्रीसमध्ये केली. डाव्या बाजूला नेपाळच्या भागात गणांची निर्मिती केली. ग्रीसला देवांची माहिती होती असे ग्रीक पुराणे दर्शवितात. पण ग्रीकांनी देवांना मानवाच्या पंक्तिला आणले. ते त्यांच्या अधोगतीचे कारण होते.

नाभीमधील धर्मातून विश्वाचं संतुलन ग्रीस करते. ग्रीक लोकांचे विशेष काम म्हणज डाव्या आणि उजव्या बाजूला जाणा-या लोकांमध्ये अखंडत्व आणणे. सचोटीचा ग्रीक गुण अलेक्झांडरच्या आयुष्यात दिसू शकतो. तो हिंदुस्थान जिंकण्यासाठी निघाला पण मागे परतला. ध्येयाकडे जायचे पण ध्येय पवित्र नसेल तर परत फिरायचे यांत सचोटीची शक्ति काम करतांना दिसते.

आदिगुरुंकडे संतुलन करण्याचे मुख्य कार्य होते. एब्राहम, मोजेस आणि महंमद यांना लोकांची अज्ञान व अनीतीमत्ता जी डावीकडे गेली होती. तिला तोंड देताना उजवीकडे जावे लागले. लोकांना त्यांच्या स्वातंत्र्यामध्ये धर्म समजवणे करू शकत नव्हते. त्यांना कायदे करावे लागले आणि शिक्षा ही त्यांना कार्यप्रवृत्त करण्यास द्यावी लागली. सॉक्रेटीसच्या वेळेपर्यंत तो ज्ञान, प्रामाणिकपणा, नैतिकता, शांती आणि इतर गुणांबद्दल बोलू शकेल इतपत लोकांची उत्क्रांत झाली होती. तो तर्कशास्त्राचा पंडीत होता. तर्कशास्त्र शुध्द आहे. सारासार विचार आंधळा आहे.

सहजयोगामध्ये श्री माताजी प्रथम आत्मसाक्षात्कार देतात. मग भाषण करतात म्हणजे आपल्याला कळू शकते. श्री माताजींनी सांगितले की दोन प्रकारचे लोक आहेत. सहजयोगी आणि सहजयोग नसलेले. काही सहजयोगी त्या किंमतीचे नाहीत. ते परत जाऊ शकतात. पण ज्ञान समजण्याइतपत त्यांची किंमत वाढू शकते. कुंडलिनी आपल्याला सामर्थ्य देते. सहस्त्रारामुळे आपल्याला ज्ञान शोषून घेता येते, त्यातील तर्क पाहू शकतो, सत्याचे मूल्यमापन करणे, अवतारांच्या नावावर पूर्वीच्या सर्व धर्मांनी पैसा केला आहे व त्यांना चिकटणा-यांना नरकाकडे ओढले आहे. सहजयोगींनी दुस-यांना बाहेर काढले पाहिजे. स्वतः आंत जाण्यापेक्षा ।

ग्रीस तसेच इजिप्त व चीन यांनी त्यांच्या संस्कृतीमध्ये समग्रता, संतुलन आणि आदर या गोष्टी आत्मसात केल्या आहेत. या देशात वेगवेगळया जागी त्यांचा प्रभाव अजून दिसून येतो. पण भारताला जी जाणिवेची गहनता आहे ती त्यांच्याकडे नाही. ग्रीसला आता सहस्त्राराच्या बिंदूकडे पोहोचायचे आहे म्हणून श्री माताजी आता ग्रीसला आल्या आहेत. श्री अथेना आता सहस्त्रारात आहे.

ग्रीक लोकांना गुंतवणुकीमधील निरूपयोगीपणाची समज आली आहे. पश्चिमेचे अनुकरण केल्यामुळे अनैतिकता आली आहे. कलीयुगाचा प्रभाव पण अजूनही ते संबीत आहेत. चारित्र्यवान स्त्रीयांबद्दल आदर, आईबद्दल आदर ठेवतात.

त्यानंतर श्री माताजी आदर याविषयी बोलल्या. ग्रीकांच्या आदरभावाच्या गुणामुळे अलेक्झँडर भारतात गेला व धार्मिक बाबतीत त्याची वाढ झाली. इंग्लिश तेथे 300 वर्षे होते. पण त्यांना काहीच मिळाले नाही. प्रत्येकाला दुस-याविषयी, त्यांच्या संस्कृतीविषयी आदर असला पाहिजे. जेव्हा ब्रिटीशांची जाणीव ख-या आदराप्रत पोहोचेल त्यावेळी जग बदलेल. बाकीच्या सहजयोगींना तर आपण जास्तच सन्मान द्यायला पाहिजे. हृदयापासून आलेला सन्मान देवाबद्दलच्या आपल्या जाणिवेची उच्चतम स्थिती दर्शवतो. आदिशक्तिचा सन्मान हृदयापासून केला पाहिजे. कृत्रिमतेने नव्हे, जेव्हा हे असं होईल त्यावेळी आपल्यात पूर्णपणे बदल होइल. देव ज्याप्रमाणे आदीशक्तिचा सन्मान करतात त्याप्रमाणे आपणही करायला शिकले पाहिजे. या बाबतीत ग्रीक लोक आपले पुढारी होऊ शकतात.

व्यक्तिगत पातळीवर सहजयोगी मंडळींनी डाव्या व उजव्या बाजूमध्ये समग्रता आणून डाव्या व उजव्या बाजूचे संतुलन केले पाहीजे. अथेनामधील समग्रतेची शक्ति योगी मंडळींना आत उत्क्रांतीला पोहोचली पाहीजे. ग्रीसमध्ये अथेना जागृत झाली पाहिजे म्हणजे ग्रीस पवित्र होईल आणि पूर्ण विश्वाचे संतुलन करण्यात मदत करू शकेल.

## ब्रम्हचैतन्य पूजा {सारांश}

**म्युनिच, जर्मनी जुलै 1989**

सहजयोगींनी परमचैतन्याच्या स्वरूपात केलेली श्री माताजींची ही पहीलीच पूजा होती. {सर्व सृष्टी व्यापणारी परमेश्वराची प्रेम शक्ति} श्री माताजींनी सांगीतले की परमचैतन्य सर्व काही करते. ही आदीशक्तिची शक्ति आहे व सर्व काही त्यातच असते. देशामध्ये फरक असतो त्याप्रमाणे ती सुध्दा आपल्याला वेगवेगळी, तुटक भासते खरे तर ती एकच स्वतःमध्येच काम करणारी शक्ति आहे.

सहजयोगींकडे ती विशेष लक्ष पुरवते परमचैतन्याशी आपण एकरूप असलो तर आपली प्रत्येक इच्छा पुरवली जाते. या निराकार शक्तिला बुध्दी, समग्रता, संघटनशक्ति सर्व काही आहे यावरही हे दैवी प्रेम आहे. आपल्या परमपूज्य आईचे प्रेम आहे. या परमचैतन्याशी एकरूप होण्यासाठी खरे {वास्तवरूप} झाले पाहिजे. श्री माताजींनी समजाविले की इतरांची छायाचित्रे असा सहजयोग करू शकत नाहीत कारण ते खरे झाले नाहीत. पावसाचे चित्र कशालाही भिजवू

भिजवू शकत नाही किंवा ते फुलांना उमलवू शकत नाही. त्याचप्रकारे आपण काहीही करत नाही. सर्व काही परमचैतन्य करते हे आपल्याला समजले पाहिजे. सहजयोग्याला हे त्याच्या हृदयालगतचे (अंतर्यामीचे) सत्य आहे याची जाणीव आहे. सहजयोगी नसलेल्याला हे समजू शकते पण हा स्वतःच्या अस्तित्वाचा भाग आहे हे समजत नाही.

परमचैतन्य हे ईश्वरी प्रेम आहे. श्री माताजींनी आपल्याला हे समजावले आहे की प्रेम म्हणजे वेडयासारखे वागणे असे आपल्या बाबतीत आहे. आपण आपली मुलेबाळे, कुटुंब यावर प्रेम करतो व ते खरे नसते, अनिश्चित असते. पण परम चैतन्याला आपले प्रेम कसे दाखवावे हे माहीत असते आणि या प्रेमाचे तत्व म्हणजे कळकळ किंवा हीत ज्याप्रकारे पाहिजे त्याप्रकारे ते आपल्याला सुधारीत असते. मग ते क्रूर असो किंवा ममतेने असो. व्यक्ति व सामूहिकता यांच्या हितासाठी ते काम करीत असते आणि काय करायचे ते त्याला योग्य रितीने माहीत असते. वेगवेगळया लोकांबरोबर ते वेगवेगळे वागते. सहजयोगींना जर समजले की ते त्यांना सुधारण्यासाठी नेहमीच काम करीत असते, तर त्यांना आयुष्यात कधीही खेद होणार नाही. श्री माताजींनी नमूद केले की सहजयोग्यांना परमचैतन्य गवसले आहे. त्यांचे आंतून संधान झाले आहे. त्यांनी काळजी करणे, विचार करणे, थांबविले पाहिजे. फक्त त्यात उडी घेऊन सत्याचा एक भाग बनले पाहीजे.

श्री माताजींनी आणि सांगितले की, युध्दात जर्मनीत झालेली मनुष्यहानी असे भयानक प्रकार पूर्वी घडले आहेत. पण त्यामधून आपल्याला सामूहिकतेची एक शिकवण मिळाली आहे. जातीयवाद, देशियवादाला डावलणारी. प्रत्येक युध्दानंतर आपले काहीतरी चुकते आहे या ज्ञानाची एक खळबळजनक लाट येऊन जाते. श्री माताजींनी एडस्, अंमली पदार्थ, गरिबी, वातावरणातील बदलाचे प्रश्न अशा नव्या प्रश्नांबद्दल चर्चा केली. त्यांनी म्हटले की नेत्यांना हे प्रश्न कसे सोडवावे हे माहित नाही. बहुतांशी लोक स्वतःच्या चुका जाणून घ्यावयाला, त्यांना तोंड द्यायला, सुधारायला तयार नाहीत, या कलीयुगामध्येही सर्व काही जे लाजीरवाणे, टाकाऊ, निरुपयोगी आहे ते लोकांसाठी चांगले झाले आहे.

भाषणाच्या शेवटी सहजयोगींना श्री माताजींनी प्रार्थना करण्यास सांगितली -

परमचैतन्याचा आम्ही एक अविभाज्य भाग आहोत याची आम्हाला जास्त जाणीव होत जावी. आम्हाला ते समजते. आम्ही ते वापरतो, आम्ही त्याने कार्य करू शकतो.

देवीपूजा - हेलीसिंकी फिनलँड

नवीन साधकांशी कसे वागावे 17/8/89

तर आता आपण इथे फिनलँड मध्ये आहोत. हा जमीनीचा शेवट आहे. सर्व प्रश्न येतात आणि शेवटी थांबतात. इथे इतके साधक आहेत की बाधांना इथे येऊन या साधकांवर हल्ला करण्याच जास्त आकर्षण आहे.

तुम्ही जेव्हा सहजयोगांत येता तेव्हां तुमच्याकडे असणारं सर्व काही तुम्हाला हळूहळू दाखविणारा सहजयोग हा एक दिवा आहे हे तुम्हाला समजले पाहिजे. उदाहरणार्थ, तुमच्या हातांत तुम्ही साप घेऊन फिरत असतां, तो तुम्हाला टाकायचा नसतो. पण जेव्हा उजेड येतो, तेव्हा तेव्हा तुम्ही साप बघता, आणि तुम्हाला भिती वाटते म्हणून साप फेकून देता. पण एखादा सहजयोगा-कडून साप आला आहे असे समजून पळून जातो.

सहजयोगामध्ये येणारे लोकही असे असू शकतात आणि स्वतःबद्दल चलबिचल असणारे त्यांना सत्याला तोंड द्यावयाचे नसेल. तुम्हाला त्यांच्याविषयी खूप काळजीपूर्वक, खूप सहनशील असले पाहिजे. कारण ते खूप अंधार व अज्ञानामधून येत आहेत. त्यांची मनःस्थिती काय आहे ते तुम्हाला माहीत नसते. कदाचित तो अर्धवेडा असेल, त्याला भयानक रोग असेल किंवा भयंकर गुरू असेल किंवा त्याला इतका त्रास असेल ज्यामुळे त्याला संवेदना नसेल तर हे सगळे बरेच गुंतागुंतीचे आहे.

सहजयोगाचे पहिले तत्व म्हणजे खेद मानून घ्यायचा नाही. कधीकधी तुम्हाला खूप काम करावे लागते. मी लोकांवर वीस तास काम केले आहे आणि तरीही ते होतच नाहीत दगडासारखे. दगडामधून तरी मी कमीत कमी गणेश करू शकले असते. इतके मेहनतीचे काम करून काहीच झाले नाही तर सहजयोगात खंत बाळगण्याचे कारण नाही. आपल्याला जे करायचे आहे ते केले पाहीजे. त्याच्या फलाची आपल्याला काळजी नको. हे गीतेचे एक मुख्य तत्व आहे, "कर्म करा पण फळाची अपेक्षा नको" हे तुम्हाला योग्य मार्गावर ठेवील. नाही तर तुम्ही निराश व्हाल.

एकदा बोस्टनमध्ये ते खूप काळजीत पडले आणि त्यांनी विचारले की ते सर्व नरकांत जाणार का? मी म्हणाले की तुम्ही आशा सोडता कामा नये. शेवटपर्यंत आपण त्यांना वाचविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आणि आता तेथे काम चालू झाले आहे. त्याचप्रमाणे तुम्हाला समजले पाहिजे की आधी तुम्हाला जास्त लोक मिळत नाहीत. शिवाय देवालाही जास्त लोक नको आहेत.नाहीतर बरेचसे कुचकामी लोक येतील. प्रथम आपल्याला चांगले सहजयोगी असलेले लोक हवेत. जे

स्वतःला सहजयोगी म्हणवतात. त्यांनी अशाप्रकारे तयार झाले पाहीजे की त्यांना चांगले सहजयोगी म्हणता येईल. मग तिथे दुसरे कोणी नाही त्यांचे चित्त चांगले असेल. एकदा ते तयार झाले तर त्यावर अख्खी इमारत उभी करता येईल. पाया कच्चा असला तर पूर्ण इमारत कोसळून पडेल.

म्हणून आपल्याला थोडेच सहजयोगी हवेत. जास्त आपण घेऊ शकत नाही. जरी आपल्याला जिकडे तिकडे लोकांची लाट दिसली तरी. इटलीमध्ये मी मिलानोला गेले होते. त्यांनी कधी माझा चेहरा पाहीला नव्हता किंवा मी कोण आहे हे त्यांना माहीत नव्हतं पण पूर्ण सभागृह भरले होते. इतके हजार लोक आले की तुम्हाला त्यातून वाट काढत जावे लागत होते. मला भविष्यही दिसत होते. म्हणून आम्ही त्या हजारोंच्या जमावातून दहा लोक मिळवले. मग आणखी दहा, मग आणखी दहा. असे करत ते गोळा होऊ लागले. कारण सहजयोगामध्ये तुम्हाला व्हावे लागते. नाही तर तुम्ही सहजयोगाच्या उपयोगाचे नाही.

तर हा मोठा प्रश्न आहे. तुम्ही कधीच निराश होता नये. चलबिचल होता नये. तुम्हाला कोणी काही बोलल्यास तो आंधळा आहे म्हणून त्यावर दया करा आणि रागावू नका. सहजयोगात कोणी अतिरेकी असतील कारण त्यात सत्य नको आहे. तुम्हाला तुमची सहनशीलता, संयम हा दाखविला पाहिजे. निराश न होणे हे महत्वाचे आहे. तुमच्याकडे कितीही सभासद असले तरी त्यांना योग्य तसं बरोबर केले पाहीजे म्हणजे पाया मजबूत होईल. पाया मजबूत असेल तर काम चालू राहील.

प्रथम माझ्याबद्दल तुम्ही जास्त बोलता नये. "सध्या आपण त्याची चर्चा करता नये कारण प्रथम आपल्याला स्वतःला समजून घेऊ या" असे तुम्ही म्हणले पाहिजे. नंतर तुम्हाला त्या कळतील. हे त्यांच्या स्वतःच्या हितासाठी आहे. त्यांच्या स्वतःच्या हितासाठी आहे. त्यांची स्वतःची शक्ति ते हाताळतात आणि ती स्वतःसाठीच ठेवतात हे त्यांना समजले की ते खुष होतील. पण माझ्याबद्दल त्यांना जास्त सांगू नका. सहजयोगातील चमत्कारांच्या गोष्टींचे वर्णन करू नका. बोलू नका. साधारणतः सहजयोगातील चमत्कारांचे फोटो दाखवू नका. तुम्ही ते तयार करून घेतले आहेत, असेच ते म्हणतील. कुंडलिनी विषयी, सहजयोगाविषयी गोष्टी सांगण्याइतपत स्वतःला मर्यादीत ठेवा. सर्वसाधारण गोष्टींत ठेवा आणि सगळ्यांना पूजेविषयी माहीती पाहीजे असे नाही. पण चक्रांविषयी माहीती सांगा. त्यांना संतुलनात कसे ठेवले पाहिजे. कुंडलिनी कशी वर ठेवली पाहिजे आणि तुम्ही नुसते म्हणा, सध्या आईचे छायाचित्र वापरू या नंतर तुम्ही तरबेज झाला की आईच्या छायाचित्राची गरज नाही. ते मग कधीचे ते सोडणार नाहीत किंवा ते मिळवण्या-साठी मारामारी करतील.

तिसरी गोष्ट म्हणजे त्यांना सामुहिकतेची भिती वाटते. म्हणून आपण सामुहीक नसलो तर आपण घाबरतो. आणि सर्व चांगली, सरळमार्गी लोक एकत्र आल्यास घवरण्याची जरुर नाही. असे त्यांना सांगितले पाहीजे. तुम्ही पहा, फक्त चोर आणि लफंगे एकत्र येतात. चांगली लोकएकत्र येत नाहीत. म्हणून आपण एकत्रित झाले पाहीजे. मग त्यांना कळेल व ते रागवणार नाहीत. नाहीतर आपण सामुहिकतेत राहीले पाहीजे असे म्हटल्यास ते संशयीत होतील. तुम्ही पाहातां प्रेमासाठी कोणी एकत्रित येत नाही. ते एकत्रित आले तर व्देष किंवा लढाई किंवा अशाच काही दुष्ट कारणांसाठी येतात. आपण प्रेमासाठी आहोत असे आपण म्हटले तर हे प्रेम म्हणजे काय गोष्ट आहे ती आम्हाला माहीत आहे असे ते म्हणतील.

वादविवाद आणि चर्चा करूनच जर तुम्हाला त्यांना आणायचं असेल तर सहजयोगाचे पूर्ण ज्ञान तुम्हाला व्यवस्थित माहीत असले पाहीजे. तुमचे व्यक्तिमत्व, तुमची मनस्थिती, आणि परिस्थिती अशी असली पाहीजे की या व्यक्तिमध्ये कांही विशेष आहे असे त्यांना वाटले पाहीजे. मग ते तुम्हाला चांगल्या प्रकारे स्वीकारतील. खंत करु नका. ही फक्त गंमत आहे. एवढंच. हा नाही मिळाला तर तो दुसरा मिळेल. हरकत नाही.

मी देशांमागून देशांत जाते आहे. इटली, जे आज फार मोठं सहजयोगी राष्ट्र आहे, तिथे ज्या ठिकाणी मोठया सभा भरतात. मोठया वृत्तपत्र परिषदा होतात अशा मोठया सभागृहाचे मी पैसे भरले, आणि आम्ही तिथे गेलो तेव्हा तिथे सभेसाठी एक कुत्रही नव्हते. आणि त्या आधी मी पोस्टर्स लावायला गेले. कारण फक्त आम्हीच तेवढे लोक होतो म्हणून मी गेले, पोस्टर्स लावायला. तरीसुध्दा एकही माणूस फिरकला नाही. ती गंमतच होती. पण त्यावेळी ती गंमत झाली म्हणून आतां तुम्ही हंसत आहांत.

म्हणून सहजयोगांत आल्यावर मग त्यांना कळेल, ते काय करीत होते, किती मूर्ख होते, कशा प्रकारचे होते. त्यांची त्यांनाच मजा येईल, तर सहजयोगांत सर्व घटना महत्वाच्या आहेत. कारण त्यामुळे आपल्याला वैचित्रय आणि आकर्षक गोष्टी मिळतात. सर्व कांही गंमत म्हणून पाहीले पाहीजे. तुम्ही लोकांनी हे समजून घ्यावे आणि या मुद्दयावर सहजतेने वागावे अशी माझी इच्छा आहे. खंत कधीच करुं नका. जर कोणी ठीक नसेल. व्हायब्रेशन-चैतन्यलहरी जाणवत्या नाहीत तर स्मितहास्य करा आणि म्हणा ठीक आहे - पुढच्या वेळी पाहू या.

परमेश्वर तुम्हांला आशिर्वाद देवो.

सहजयोग्यांच्या वर्तणुकीचे नियम :-

सर्व सहजयोग्यांसाठी श्री माताजींनी केलेला उपदेश :-

1.

1. श्री माताजींचा फोटो कोणाला विकू नये. फॉलोअपच्या वेळी ख-या साधकांना तो विनामूल्य देता येईल. पण जाहीर कार्यक्रमाच्या वेळी देऊ नये.

2. पुजा किंवा जाहीर कार्यक्रमांच्या वेळी श्री माताजींनी परवानगी दिल्याशिवाय कोणीही {सहज-योगी अथवा पत्रकारांनी} फोटो घेउु नयेत. परवानगी शिवाय कोणी असे करताना आढळल्यास सहजयोगी मंडळींनी दक्ष राहून त्यास मनाई करावी. थांबवावे.

3. कुठलेही छापील साहीत्य जाहीर कार्यक्रमांना विकले जाणार नाही. अपवाद - श्री माताजींची संमती असलेले आणि विक्रीसाठी असलेले छापील साहित्यच फक्त. श्री माताजींची संमती असलेली सहजयोगावरील बाकी पुस्तके फक्त केंद्रावर ख-या साधकांनाच दिली जातील. {कुठल्याही छापील साहित्यांत मंत्राची रोग निवारण्याची लक्षणे घालू नये.}

4. जाहीर कार्यक्रमामध्ये अंगठया, पदके विकणे यासारख्या खरेदी - विक्रीच्या गोष्टी असता नये. फक्त सहजयोग्यांना योग्य किंमतीत {नफा न घेता} त्या विकू शकता.

5. जाहीर कार्यक्रम किंवा पुजा या वेळी श्री माताजींच्या भाषणाचे विना परवाना ध्वनीमुद्रण {ऑडीओ किंवा व्हीडीओ} चालणार नाही. ऑडीओ आणि व्हिडीओ कॅसेटस् एक दुस-या कडून प्रती करून घेऊ नये. नियोजित वितरण केंद्राकडून त्या विकत घ्याव्या.

6. पुजा किंवा जाहीर कार्यक्रमाचे वेळी डोळे बंद ठेवणे किंवा स्वतःला बंधन देणे हे श्री माताजींनी सांगितल्याशिवाय करू नये.

7. पूजा किंवा जाहीर कार्यक्रमाचे वेळी श्री माताजींकडे पाय सोडून बसणे अनादर दर्शविते तेव्हा असे करू नये.

8. श्री माताजींची खुर्ची {त्या जेव्हा बसतील तेव्हा} फक्त आसानाने {सिल्क किंवा ब्रोकेडचे कापड} जे या कारणासाठी त्यांच्यासाठी आणले असेल त्याने झाकावी. कोणत्याही सहजयोग्यांनी त्यांच्या व्यक्तिगत साडया किंवा शाली बसायला, चालायला किंवा कोणत्याही प्रकारे वापरू नये. त्यांनी वापरलेले सर्व काही त्यांच्यासाठी वेगळे ठेवावे. दुस-या कोणीही ते परत वापरू नये.

9. व्यासपीठावर श्री माताजींच्या खुर्चीच्या उजव्या बाजूला {श्रोत्यांकडे तोंड करून} टेबल, त्यावर पाण्याचे भांडे व ग्लास {झाकलेला} ठेवावा. त्यांच्या डाव्या बाजूला स्टॅण्डवर मेणबत्ती ठेवावी. त्यांच्या डाव्या बाजूला विराटाचा चार्ट {नकाशा} स्टॅण्डवर ठेवावा.

कार्यक्रमानंतर व्हायब्रेट करण्यासाठी व प्रसाद म्हणून वाटण्यासाठी पुरतील इतके चणे ठेवावे. पुजा वा जाहीर कार्यक्रमांचे वेळी कोणीही व्यासपीठावर थांबणे, बसणे, उठणे, चालणे हे सर्व करू नये. त्यांच्या खुर्चीच्या उजव्या बाजूला व्यासपीठावर कापड घातलेले टेबल व त्यावर श्री माताजींचा फ्रेम केलेला फोटो असावा. हा फोटो शक्यतो नेहमीचा ध्यानाचा फोटो {काळा पांढरा, अभयदान मुद्रेतील भारतातील फोटो} असावा. किंवा दुसरा कोणताही पण पूजेचा फोटो नसेल ही काळजी घ्या. फोटोसमोर उदबत्तीच्या परात उद्बत्त्या लावल्या असाव्या. मेणबत्ती {दिवा} फुले, माळा घालू शकता.

10. नकाशात चक्रांचे खालील रंग दाखवा.

| | | |
|---|---|---|
| मूलाधार | - | कोरल लाल {पोवळ्यांचा} |
| स्वाधिष्ठान | - | पिवळा |
| मणीपूर | - | पाचूचा हिरवा |
| अनाहत | - | लाल {माणीक} |
| विशुध्दी | - | निळा |
| आज्ञा | - | मोत्याचा पांढरा |
| सहस्त्रार | - | सर्व रंग |

सर्वसाधारण -

11. श्री माताजींचा फोटो भिंत सजविण्यासाठी वापरू नये. प्रत्येक दिसणा-या त्यांच्या फोटोला पुढील नियम वापरावे लागतील. दर दिवशी प्रत्येकाने फोटो पुसावा. {शक्य असल्यास गुलाब पाण्याने} अत्तर कुंकू लावावे, फुले घालावी, उदबत्ती लावावी, पूजा करावी. जर फोटोचा सन्मान ठेवला नाही तर त्यांचे चित्त तिथून परत जाण्याचा संभव असतो.

12. जर श्री माताजींनी खाऊन उरलेले पदार्थ मिळाले स्वतः एकट्याने खाऊ नये. सर्वांत सारखे वाटून घेतलेला तो प्रसाद असतो.

13. सहजयोगींनी स्वतःचा लीडरची परवानगी घेतल्याशिवाय त्यांचे केंद्र, त्यांच्या देशाचं प्रतिनिधीत्व करायला दुस-या देशात जाऊ नये, त्यांनी आश्रमात राहू नये. स्वतंत्रपणे त्यांचे नातेवाईक किंवा मित्र यांचेकडे राहावे. ज्यांच्याकडे त्यांच्या लीडरने संदर्भ दिलेले पत्र असेल, त्याला फक्त, जर त्या आश्रमाचे नेते त्या माणसाला विनासायास ठेवू शकत असतील तर राहातां येईल, आणि भेट देणा-या योगीला रोजचा खर्च स्वतः करावा लागेल.

14. भारतीयांसाठी - झेंडूची फुले किंवा माळा श्री माताजींना अर्पण करण्यास वापरू नये.

बातम्या :-

... सहजयोगी जे धंदेवाईक आहेत त्या सर्वांनी आपल्या लेटरहेडवर सहजयोगाच्या शास्त्रीय व तर्कशुध्द प्रणालीबद्दल लिहावे. ते सहजयोगांत कसे आले व त्यांची प्रगती झाली ते लिहावे. सर्व सहजयोगी ज्यांच्या नोक-यांत प्रगती झाली, किंवा वैवाहिक जीवन सहजयोगांत आल्यापासून सुधारले, किंवा भूतबाधा, अगुरूंपासून सुटका झाली त्याबद्दल त्यांनी लिहून त्यांच्या केंद्राच्या लीडरकडे द्यावे. ज्यांची रोगापासून मुक्तता झाली त्यांनी त्यांचे अनुभव, वैद्यकीय कागदपत्रे, डॉक्टरचे मत, जमल्यास चिकित्सेच्या सुरवातीपासून ते बरे होईपर्यंतचे द्यावे. ज्यांना पैशाच्या बाबतीत, बौध्दिक, धार्मिक, भावनिक मदत झाली त्यांनीसुध्दा श्री माताजींना आभार प्रदर्शित करणारे पत्र लिहून ते केंद्राच्या लीडरकडे द्यावे.

... भारतीय सहजयोगी डॉ. दिपक चुग यांना नुकतीच "सहजयोगाचे फिजीऑलॉजीवर होणारे परिणाम" या विषयावर आधारित एम.डी. ही पदवी मिळाली आहे.

... सोव्हीएट युनीयन व "लाईफ इटर्नल ट्रस्ट" मध्ये झालेल्या सहजयोगाच्या उपचार व त्यावरील संशोधनाबाबत झालेल्या संयुक्त करारानुसार डॉ.निगम व डॉ. राय हे नुकतेच फॉलोअप कार्यक्रमांसाठी मॉस्कोला गेले आहेत.